सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थान रिक्त न केल्यास करावयाची कार्यवाही.

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०२६/प्र.क्र.३५/सेवा ४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०३ जून, २०२६.

**<u>वाचा</u> -**

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१२/प्र.क्र.८९/सेवा ४, दिनांक १६.०२.२०१३.

२) केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, २०२१.

३) केंद्र शासन, कार्यालयीन ज्ञापन क्र.२८/९१/२०२२-P&PW(B)(२), दि.२०.१०.२०२३.

**<u>प्रस्तावना -</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३३ मध्ये तसेच शासन निर्णय दि.१६.०२.२०१३ मध्ये शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसुली करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूदी आहेत -

***"१३३. शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसुली***

*(१) "ना-मागणी प्रमाणपत्र" देण्यासंबंधात कार्यालय प्रमुखाकडून नियम ११९ च्या पोट-नियम (१) अन्वये सूचना मिळाल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता आपले अभिलेख पडताळून पाहील व शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या आठ महिने अगोदर, त्या कर्मचाऱ्याकडून त्याच्या सेवानिवृत्तीच्या अगोदरच्या आठ महिन्यांच्या कालावधीबाबत वसुलीयोग्य कोणतीही लायसन्स फी असल्याचे कार्यालय प्रमुखाला कळवील. कार्यालय प्रमुखास शिल्लक लायसन्स फीच्या वसुलीसंबंधात ठराविक तारखेपूर्वी काहीही न कळल्यास, शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याकडून त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या आठ महिन्यांच्या कालावधीबाबत वसुलीयोग्य कोणतीही लायसन्स फी येणे नाही असे गृहीत धरण्यात येईल.*

*(२) नंतरच्या आठ महिन्यांची म्हणजेच शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंतची लायसन्स फी, त्या कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्त्यांमधून दरमहा वसूल करण्यात येत असल्याबद्दल कार्यालय प्रमुख खात्री करून घेईल.*

*(३) संबंधित कार्यकारी अभियंत्याने, पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या संबंधात वसुलीयोग्य लायसन्स फीची रक्कम कळविलेली असेल तेव्हा कार्यालय प्रमुख, शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या चालू वेतन व भत्त्यांमधून बाकी राहिलेली लायसन्स फी हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात येत असल्याबाबत खात्री करून घेईल. जेव्हा संपूर्ण रक्कम वेतन व भत्त्यांमधून वसूल होत नसेल तेव्हा शिल्लक रक्कम, उपदानाचे प्रदान प्राधिकृत करण्यापूर्वी त्यामधून वसूल केली जाईल.*

*(४) संबंधित कार्यकारी अभियंता, शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेनंतर एक महिन्याच्या अनुज्ञेय कालावधीपर्यंत शासकीय निवासस्थान ठेवून घेण्याबद्दलची लायसन्स फी देखील कार्यालय प्रमुखास कळवील. कार्यालय प्रमुख, ती लायसन्स फी आणि वसूल न झालेली पोट-नियम (३) मध्ये नमूद केलेली असल्यास, कोणतीही लायसन्स फी, उपदानाच्या रकमेशी समायोजित करील.*

*(५) एखाद्या विशिष्ट प्रकरणी, कार्यकारी अभियंत्याला शिल्लक राहिलेल्या लायसन्स फीची रक्कम निर्धारित करणे शक्य नसेल तर, तो कार्यकारी अभियंता, उपदानाच्या दहा टक्के रक्कम, पुढील सूचना देण्यात येईपर्यंत, रोखून ठेवण्याबाबत कार्यालय प्रमुखाला कळवील.*

*(६) शासकीय निवासस्थान मिळालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर एक महिन्याच्या अनुज्ञेय कालावधीहून अधिक मुदतीसाठी शासकीय निवासस्थान ताब्यात ठेवल्याबद्दलची लायसन्स फी वसूल करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्याची असेल,*

*टीपः- या नियमाच्या प्रयोजनार्थ लायसन्स फीमध्ये, शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय निवासस्थानास किंवा तेथील जोडणी कामास कोणतेही नुकसान किंवा हानी पोहोचविल्याबद्दल त्याने द्यावयाच्या इतर कोणत्याही आकारांचा समावेश असेल."*

केंद्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, २०२१ मधील नियम ६८ च्या धर्तीवर शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांचे समायोजन व वसूलीबाबत असलेल्या उपरोक्त तरतूदीमध्ये भर घालण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

या प्रकरणी शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

(१) ज्या प्रकरणी कार्यकारी अभियंत्याला थकीत लायसन्स फी निश्चित करणे शक्य नाही, त्या प्रकरणी लायसन्स फीची तसेच नुकसानभरपाईची वसुली करण्याची जबाबदारी ही संबंधित कार्यकारी अभियंत्याची असेल. तसेच, शासकीय निवासस्थानात राहत असलेल्या सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याची रोखून धरलेली उपदानाची रक्कम, शासकीय निवासस्थान प्रत्यक्षात रिक्त केल्यानंतर कार्यकारी अभियंत्याकडून "ना मागणी प्रमाणपत्र" सादर केल्यावर त्वरित दिली जाईल.

(२)(अ) शासकीय निवासस्थान प्रत्यक्षात रिक्त केल्यानंतर, कार्यकारी अभियंता अर्जदाराने अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत शासकीय कर्मचाऱ्याला "ना मागणी प्रमाणपत्र" देईल.

(ब) जर कार्यकारी अभियंत्याने अर्जाच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत 'ना मागणी प्रमाणपत्र' दिले नाही, तर शासकीय कर्मचारी लायसन्स फीची थकबाकी आणि नुकसानभरपाई समायोजित केल्यानंतर, रोखून धरलेल्या उपदानाच्या अतिरिक्त रकमेवर व्याज मिळण्यास पात्र असेल. सदर व्याज सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधींमधील ठेवींना लागू असलेल्या दराने लागू राहील.

(क) सदर व्याज सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय निवासस्थान रिक्त केल्यानंतर ना मागणी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ते उपदानाच्या रोखून धरलेल्या अतिरिक्त रकमेचा परतावा मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी, कार्यकारी अभियंत्याकडून सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास देय असेल.

(३) शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३३ (५) नुसार रोखून ठेवलेल्या उपदानाच्या रकमेतून, समायोजन केल्यानंतर किंवा उपनियमांतर्गत कोणतीही उपदानाची रक्कम रोखून ठेवलेली नसल्यास, अनुज्ञप्ती शुल्क किंवा नुकसानभरपाई (जास्त काळ वास्तव्य, अनधिकृत ताबा, उपभाडेपट्टा देणे, अपात्र अधिकाऱ्यास हस्तांतरण इत्यादी कारणांमुळे) तसेच वीज, पाणी किंवा PNG शुल्काबाबतची कोणतीही थकबाकी शिल्लक राहिल्यास, ती संबंधित लेखाधिकाऱ्यामार्फत निवृत्तिवेतनधारकाच्या महागाई वाढीतून त्याच्या संमतीशिवाय वसूल करण्याची कार्यवाही करावी आणि अशा प्रकरणात संबंधित थकबाकीची पूर्ण वसुली होईपर्यंत निवृत्तिवेतनावर कोणतीही महागाई वाढ अदा केली जाणार नाही. तसेच कर्मचाऱ्याने अनुज्ञेय कालावधीनंतरही सेवानिवासस्थान रिक्त न केल्यास दंडनीय अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम वसूल होईपर्यंत त्याच्या सेवानिवृत्ती वेतनामध्ये महागाई वाढीचे प्रदान करण्यात येऊ नये.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या विद्यमान तरतूदींमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदींपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. या नियमात रीतसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

३. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी / कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये यांमधील निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६०३१७२३५५५१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=A7F08DB3910ECF0F88C442FBDE20F7B84E70DFD0BF4DCD977ABAB75B3FCB8508, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2026.06.03 17:24:52 +05'30'

(मनिषा कामटे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
९) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
११) सर्व कोषागार अधिकारी,
१२) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१३) मा.राज्यपाल यांचे सचिव,
१४) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
१५) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
१६) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१७) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२२) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२३) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२
२७) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०००३२.
२९) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
३०) कार्यवाह, बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन, वर्ग क्र.२१, तळ मजला, छबिलदास हायस्कूल, वनमाळी हॉलसमोर, दादर (प), मुंबई-४०० ०२८.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन बेळगाव, १०९१, अनंतशयन गल्ली, लक्ष्मी निवास, दुसरा मजला, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग,
३३) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
३४) सर्व विभागीय आयुक्त,
३५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३६) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
३७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३८) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३९) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४१) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,

४२) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे,

४३) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४००००१

४४) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई ४०००२०

४५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४००००४

४६) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३

४७) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०००२५

४८) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१

४९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०००२८

५०) वित्त विभागातील सर्व कार्यासने,

५१) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

**Procedure to be followed in case where retired government employees do not vacate government accommodation.**

**Government of Maharashtra**
**Finance Department**
**Government Resolution No.: PEN-2026/CR.35 /SER-4**
**Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date: 03 June, 2026.**

**Read -**

1) **Finance Department** Government Resolution No.: SENIVE-2012/C.R.89/ Service 4, Date: 16.02.2013.

2) **Central Civil Services** (Pension) Rules, 2021.

3) **Central Government, Office Memorandum** No. 28/91/2022-P&PW(B)(2), Date: 20.10.2023

**Preamble -**

The provision regarding adjustment & recovery of dues pertaining to government accommodation under Rule 133 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 & in the amendments according to Government Resolution dated 16.10.2013 are as below:-

*"133. Adjustment and Recovery of Dues Pertaining to Government Accommodation:*

*(1) The Executive Engineer concerned on receipt of intimation from the Head of Office under sub-rule (1) of rule 119 regarding the issue of 'No demand certificate' shall scrutinise his records and inform the Head of Office eight months before the date of retirement of the allottee, if any licence fee was recoverable from him in respect of the period prior to eight months of his retirement. If no intimation in regard to recovery of outstanding licence fee is received by the Head of Office by the stipulated date, it shall be presumed that no licence fee was recoverable, from the allottee in respect of the period preceding eight months of his retirement.*

*(2) The Head of Office shall ensure that licence fee for the next eight months, that is upto the date of retirement of the allottee is recovered every month from the pay and allowances of the allottee.*

*(3) Where the Executive Engineer concerned intimates the amount of licence fee recoverable in respect of the period mentioned in sub-rule (1), the Head of Office shall ensure that outstanding licence fee is recovered in instalments from the current pay and allowances of the allottee and where the entire amount is not recovered from the pay and allowances, the balance shall be recovered out of the gratuity before its payment is authorised.*

*(4) The Executive Engineer concerned shall also inform the Head of Office the amount of licence fee for the retention of Government accommodation for the permissible*

*period of one month beyond the date of retirement of the allottee. The Head of Office shall adjust the amount of that licence fee from the amount of the gratuity together with the un-recovered licence fee, if any, mentioned in sub-rule (3).*

*(5) If in any particular case, it is not possible for the Executive Engineer concerned to determine the outstanding licence fee, that Executive Engineer shall inform the Head of Office that ten per cent of the gratuity, may be withheld pending receipt of further information.*

*(6) The recovery of licence fee for the occupation of the Government accommodation beyond the permissible period of one month after the date of retirement of the allottee shall be responsibility of the Executive Engineer concerned.*

*Note. For the purpose of this rule, the licence fee shall also include any other charges payable by the allottee for any damage or loss caused by him to the accommodation or its fittings."*

On the lines of Rule 68 of the Central Civil Services (Pension) Rules, 2021, the matter of expanding the aforementioned rule regarding the adjustment and recovery of dues related to government accommodation was under the consideration of the Government.

**Government Resolution-**

**The Government is now pleased to decide as follows:**

**(1)** Where it is not possible for the Executive Engineer to determine the outstanding license fee, the recovery of licence fees and damages shall be the responsibility of the concerned Executive Engineer. Furthermore, the withheld gratuity amount of a retired government employee residing in government accommodation shall be released immediately upon the submission of a "No-Demand Certificate" by the Executive Engineer after actual vacation of the government accommodation.

**(2) (A)** The Executive Engineer shall ensure the "No-Demand Certificate" shall be given to the government employee within a period of fourteen days from the date of submission of application for the said certificate after actual vacation of the government accommodation.

**(B)** If the Executive Engineer fails to issue the 'No-Demand Certificate' within fourteen days from the date of the application, the government employee shall be entitled to receive interest on the excess withheld amount of the gratuity after adjusting the arrears of license fee and damages. The said interest shall be applicable at the rate applicable to deposits in the General Provident Fund (GPF).

**(C)** The said interest shall be payable by the Executive Engineer to the retired government employee for the period from the date the retired government employee submits the application for a No-Demand Certificate after vacating the government accommodation, upto the date of actual refund of the excess withheld gratuity amount.

**(3)** In accordance with Rule 133 (5) of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, if any arrears remain outstanding regarding license fee or damages (for overstay or unauthorized occupation or subletting or transfer to an ineligible officer, etc.)

as well as electricity, water, or PNG charges after adjustment from the withheld gratuity amount of the retired employees, or if no gratuity amount has been withheld under the sub-rules, action should be taken by the concerned Accounts Officer to recover the same from the pensioner's Dearness Relief without the consent of the pensioner and in such case no Dearness Relief shall be disbursed until the full recovery of the such dues has been made. Furthermore, if the employee does not vacate the official accommodation even after the permissible period, the payment of Dearness Relief on their pension should not be made until the penal license fee amount is recovered.

**2.** The existing provisions of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, shall be deemed to have been amended to the extent of the provisions of this Government Resolution. A formal amendment to these rules will be made in due course.

**3.** The Government is also pleased to order that the above decision shall apply, with appropriate modifications, to the pensioners/family pensioners of recognized and aided educational institutions, agricultural/non-agricultural universities, and non-government colleges affiliated with them, to whom the pension scheme is made applicable.

**4.** In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Maharashtra Act No. V of 1962) and all other powers enabling it in this behalf, the Government is also pleased to order that the above decision shall also apply to the pensioners/family pensioners of Zilla Parishads.

5. This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202606031723555105. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

MANISHA
YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=A7F08DB3910ECF0F88C442FBDE20F7B84E70DFD0BF4DCD977ABAB75B3FCB8508, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2026.06.03 17:25:33 +05'30'

**(Manisha Kamte)**
**Deputy Secretary to the Government**

**************************